सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर

शासकिय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर.
दुरध्वनी क्र. ०७१२-२५५७२६६ / ४६
E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : www.rdtenagpur.org.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/शैवि-२/२०२०/1918
दिनांक:- 12 MAY 2020

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

**विषय:- कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे व तदअनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्राकाचे नियोजन करण्याकरीता मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांनी गठीत केलेल्या राज्यस्तरीय समितीचा अहवाल.**

**संदर्भ:- मा.शिक्षण संचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्रं.युएनआय/२०२०/ बैठक/विश-१/४१३१ A,दिनांक- ०८/०३/२०२०**

उपरोक्त विषयाकिंत संदर्भीय पत्रानुसार, राज्यातील सर्व विद्यापीठाचे शैक्षणिक कॅलेंडर व परीक्षाकरीता एक सामाईक योजना तयार करण्याकरीता विद्यापीठाचे कुलगुरु तसेच संचालक,उच्च शिक्षण व संचालक, तंत्रशिक्षण यांची एक राज्यस्तरीय समितीचा दिनांक ०६/०४/२०२० रोजी गठीत समितीचा शासनास सादर केलेला स्विकृत अहवाल सोबत जोडलेला आहे त्याप्रमाणे आवश्यक कार्यावाही करण्यात यावी.

सोबत:-वरीलप्रमाणे

**(डॉ. राम निबुदे)**
**प्र.सहसंचालक**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,**
**नागपूर**

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१

www.dhepune.gov.in Email- vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१२४६३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्रमांक- युएनआय/२०२०/बैठक/विशि-१/ 4939 A दिनांक- ८ मे, २०२०

प्रति,

१.मा.कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२.मा.कुलगुरु, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक नागपूर
३.मा.कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
४.मा.कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे रायगड.

**विषय कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे व तद्अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरीता मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी गठीत केलेल्या राज्यस्तरीय समितीचा अहवाल.**

संदर्भ शासनपत्र क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१२३/विशि-३
दिनांक ८ मे, २०२०

उपरोक्त विषयाबाबतचे शासनाचे पत्र व सहपत्रे सोबत जोडली आहेत, कृपया अवलोकनी घ्यावीत.

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निर्देशानुसार विद्यापीठांच्या परीक्षा घेण्याबाबत तसेच राज्यातील सर्व विद्यापीठांचे शैक्षणिक कॅलेंडर व परीक्षांकरिता एक सामाईक योजना तयार करण्याकरिता राज्यातील चार विद्यापीठांचे कुलगुरु तसेच संचालक, उच्च शिक्षण व संचालक, तंत्र शिक्षण यांची एक राज्यस्तरीय समिती दिनांक ०६ एप्रिल, २०२० रोजीच्या आदेशान्वये गठीत करण्यात आली. सदर समितीने आपला अहवाल शासनास दिनांक ६ मे, २०२० रोजी सादर केला आहे.

सदर अहवालामधील शिफारसी राज्य शासनाने स्विकृत केल्या आहेत. सदर अहवालाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. या अहवालातील शिफारसीच्या अनुषंगाने विद्यापीठांनी आवश्यक ती उचित कार्यवाही करुन आपल्या अधिनस्थ सर्व महाविद्यालयांना कळविण्यात यावे ही विनंती.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- माहितीस्तव सादर-

१. स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. स्वीय सहाय्यक, मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३३
३. मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
४. मा.आयुक्त, सीईटी सेल, मुंबई.
५. संचालक, तंत्र शिक्षण,मुंबई.
६. संचालक,कला शिक्षण, मुंबई.

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१२३/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ८ मे, २०२०.

प्रति,

संचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य
पुणे.

विषय: कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे व तद्अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठाच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरीता मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी गठित केलेल्या राज्यस्तरीय समितीचा अहवाल

महोदय,

मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निर्देशानुसार विद्यापीठांच्या परीक्षा घेण्याबाबत तसेच राज्यातील सर्व विद्यापीठांचे शैक्षणिक कॅलेंडर व परीक्षांकरिता एक सामाईक योजना तयार करण्याकरिता राज्यातील चार विद्यापीठांचे कुलगुरु तसेच संचालक, उच्च शिक्षण व संचालक, तंत्र शिक्षण यांची एक राज्यस्तरीय समिती दिनांक ६ एप्रिल, २०२० रोजीच्या आदेशान्वये गठित करण्यात आली. सदर समितीने आपला अहवाल शासनास दिनांक ६ मे, २०२० रोजी सादर केला आहे. सदर अहवालामधील शिफारशी राज्य शासनाने स्विकृत केल्या आहेत. तरी या शिफारशींनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधित विद्यापीठांना कळविण्यात यावे.

आपला,

(सतिश तिडके)
उप सचिव , महाराष्ट्र शासन

Scanned by CamScanner

# कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे व तद्अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठाच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरीता मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी गठित केलेल्या राज्यस्तरीय समितीचा अहवाल

सविनय सादर
मा. सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र शासन

दिनांक- ०६ मे, २०२०

Scanned by CamScanner

अनुक्रमणिका


| अनुक्रमणिका | विषय | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १. | प्रस्तावना | ३ |
| २. | शिफारशी | ४ |
| ३. | ऋणनिर्देश | ९ |
| ४. | परिशिष्ट १ | ११ |
| ५. | परिशिष्ट २ | १३ |


Scanned by CamScanner

## कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे व तद्अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठाच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरीता मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी गठित केलेल्या राज्यस्तरीय समितीचा अहवाल

**प्रस्तावना:**

कोविड -१९ महामारीच्या प्रादुर्भावामुळे आणि त्याअनुषंगाने केंद्र व राज्य शासनाने केलेल्या विविध उपाययोजनांच्या निमित्ताने, राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरू, तंत्रज्ञान आणि मुक्त विद्यापीठांच्या कुलगुरूंची तसेच सचिव, उच्च व तंत्रशिक्षण शिक्षण विभाग, संचालक, उच्च शिक्षण विभाग, संचालक, तंत्र शिक्षण विभाग अशी एकत्रित बैठक मा. मंत्री, श्री. उदयजी सामंत, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य द्वारे दिनांक ६ एप्रिल, २०२० रोजी ११.०० वाजता व्हिडीयो कॉन्फरन्सिंगच्या माध्यमाद्वारे आयोजित करण्यात आली. विद्यापीठांचे शैक्षणिक सत्र २०१९-२०२० आणि २०२०-२०२१ साठीचे वेळापत्रके आणि सत्र परीक्षांची फेररचना व निकाल जाहिर करणे या मुख्य विषयांवर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकी दरम्यान माननीय मंत्री महोदयांनी विद्यापीठांच्या परीक्षांचे आयोजन, यावर गंभीर चिंता व्यक्त करत राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांनी एकाच वेळी परीक्षा आयोजित कराव्यात व शैक्षणिक वेळापत्रकांमध्ये साधर्म्य असावे असे सूचित केले. याअनुषंगाने अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीत राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांचे शैक्षणिक वेळापत्रक व परीक्षांचे नियोजनासाठी खालील सदस्यांची समिती नेमण्यात आली. संचालक, उच्च शिक्षण विभाग ह्यांची स्वाक्षरी असलेल्या पत्रकान्वये (दिनांक ६ एप्रिल, २०२०, संदर्भ. क्र. २००४०६/१९) सदर समितीने मंत्री महोदय व सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांना तातडीने अहवाल सादर करण्यासाठी विनंती करण्यात आली.

**समिती:**

१. प्रा. सुहास पेडणेकर, कुलगुरू, मुंबई विद्यापीठ (निमंत्रक )
२. प्रा. नितीन करमळकर, कुलगुरू, सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
३. प्रा. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ
४. प्रा. शशिकला वंजारी, कुलगुरू, एस.एन.डी. टी, विद्यापीठ
५. डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण , महाराष्ट्र शासन
६. डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन

कोविड-१९ चे अरिष्ट हे समाज आणि राज्य यांना आव्हान आहे. कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे सर्वसामान्य जनजीवन विस्कळीत झाले आहे. याचा थेट परिणाम अनेक घटकांवर झाल्याचे दिसून येत आहे. सर्व देशाचा ताबा घेऊन शैक्षणिक संस्थांच्या दैनदिन कार्यपद्धतीवरही याचे गंभीर परिणाम झाले आहेत. नेहमीच्या परीक्षांचे वेळापत्रक कोलमडले असून त्याचा नियोजनांवर मोठा परिणाम झाला आहे. १४ मार्च, २०२० पासून शैक्षणिक संस्था बंद ठेवण्यात आल्या आहेत. कोविड-१९ मुळे उद्भवलेली ही परिस्थिती कशा पद्धतीने बदलेल याचे चित्र अजूनही स्पष्ट झाले नाही.

Scanned by CamScanner

समितीची पहिली बैठक ऑनलाईन पद्धतीने दिनांक १४ एप्रिल, २०२० रोजी पार पडली. बैठकीत वरील विषयांच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. तसेच पुढे सर्वानुमते असेही ठरले की, याबाबत अंतिम निर्णय घेण्यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाचा अहवाल / मार्गदर्शक तत्त्वे सादर होण्याची वाट पहावी.

२९ एप्रिल, २०२० रोजी पत्र.क्र. डी.डी. नं, एफ-१/२०२० (सचिव) रोजी विद्यापीठ अनुदान आयोगने परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकांबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या. त्यानंतर या समितीची दुसरी बैठक ऑनलाईन पद्धतीने दिनांक १ मे, २०२० रोजी घेण्यात आली. बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांवर चर्चा करण्यात आली. तसेच याबावत उच्च शिक्षणातील सर्व भागधारकांच्या सूचना आणि मते मागवावीत असे चर्चेदरम्यान एकमताने ठरविण्यात आले. समितीने सर्व कुलगुरू व इतर भागधारकांबरोबर टेले-कॉन व ऑनलाईन चर्चेच्या अनेक फेऱ्या आयोजित केल्या. शैक्षणिक संस्थांचे संचालक मंडळ, प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थी संघटना या सर्वांकडून लिखित सूचना मागविण्यात आल्या. त्यानंतर समितीच्या अनुक्रमे तीन बैठका दिनांक ३ मे, २०२०, ४ मे २०२० आणि ०६ मे २०२० रोजी आयोजित करण्यात आल्या.

**शिफारशी:**

विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमित केलेली मार्गदर्शक तत्वे, सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंसह विविध भागधारकांनी केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षांचे नियोजन आणि शैक्षणिक वेळापत्रकाबाबत समिती खालील शिफारशी करीत आहे.

(अ) विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांतील ५ व्या क्रमांकातील परीक्षा या शिर्षकाअंतर्गत राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे तसेच राज्य समुह विद्यापीठे अनुपालन करतील.

१. कोव्हिड-१९ मुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने 'सामाजिक अंतर' व विद्यार्थ्यांची सुरक्षा व आरोग्य याचे गांभीर्य लक्षात घेता पदविका, पदवीपूर्व आणि पदव्युत्तरच्या अंतिम वर्षातील विद्यार्थी वगळून इतर विद्यार्थ्यांना (परिशिष्ट-१) मिळणारी ग्रेड ही ५०% अंतर्गत मूल्यमापनावर आधारित आणि ५०% पूर्वीच्या सत्रांतील परीक्षेचे गुण (उपलब्ध असल्यास) ठरवावी. अंतर्गत मूल्यमापन हे निरंतर मूल्यमापन, सत्रपूर्व परीक्षा, सत्रमध्य परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन किंवा मुलांच्या प्रगतीसाठी असलेले इतर कुठलेही यापैकी काहीही असू शकेल.

जर पूर्वीच्या परीक्षा किंवा सत्रांचे गुण उपलब्ध नसल्यास विशेष करून वार्षिक सत्राच्या पहिल्या वर्षांच्या परीक्षांच्या बाबतीत १००% अंतर्गत मूल्यमापन करण्यात यावे.

जर विद्यार्थ्याला स्वतःच्या ग्रेड (श्रेणी) मध्ये सुधारणा हवी असल्यास पुढील सत्रामध्ये त्याने/तिने परीक्षा द्याव्यात. सत्रांतर्गत परीक्षा ही कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावामुळे विद्यमान शैक्षणिक वर्षासाठी (२०१९-२०२०) करण्यात आलेली उपाययोजना आहे, जेणे करून सर्व भागधारकांच्या सुरक्षेचा आणि आरोग्याचा प्रश्न उद्भवणार नाही आणि विद्यार्थ्यांसाठी परीक्षांचे पावित्र्य आणि गुणवत्ता सांभाळली जाईल.

Scanned by CamScanner

याशिवाय खालील उपाय योजना करण्यात याव्या:

i) ज्या विषयांमध्ये विद्यार्थी अनुतीर्ण झाला असल्यास "कॅरी फॉरवर्ड" च्या पद्धतीनुसार विद्यमान शैक्षणिक वर्षापुरतेच असेल तो प्रत्येक विद्यार्थी पुढच्या सत्रात किंवा पुढच्या वर्षात प्रवेश करेल. एवढेच नव्हे तर गैरहजर किंवा अनुतीर्ण विषयांच्या परीक्षा त्याने जेव्हा त्या परीक्षांचे आयोजन होईल तेव्हा उत्तीर्ण व्हावे.

प्रत्येक विद्यापीठाने महाविद्यालयीन स्तरावर अशा प्रकारच्या "कॅरी फॉरवर्ड" परीक्षा पुढचे शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर चार महिन्यांच्या आत घेण्यात याव्यात.

ii) ज्या विद्यार्थ्यांना आपल्या ग्रेड मध्ये सुधारणा करायची असेल, त्याला अजून एक संधी उपलब्ध होईल. त्याने विद्यमान सत्रातील परीक्षा पुढील सत्रात किंवा पुढील शैक्षणिक वर्षात द्याव्यात किंवा पूरक परीक्षा द्याव्यात. अशा प्रकारे वर्ग/ ग्रेड परीक्षा सदर महाविद्यालयाने पुढील शैक्षणिक वर्षात आपल्या सोयीप्रमाणे आयोजित कराव्यात.

२. विद्यार्थ्यांच्या किमान उपस्थितीबाबतची टक्केवारी लक्षात घेता, टाळेबंदीचा कालावधी हा त्या विद्यार्थी/ संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा उपस्थिती कालावधी म्हणून ग्राह्य धरण्यात यावा.

३. सर्व अंतिम वर्षाच्या परीक्षा (पदविका, पदवीपूर्व आणि पदव्युत्तर) (परिशिष्ट-१) सर्व विद्यापीठांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे (परीक्षा क्र. १,२, ३ आणि ४) आयोजित कराव्यात, त्या खालील मुद्द्यांच्या आधारे अधिक सोप्या पद्धतीने विशद करण्यात येत आहेत.

अ) शैक्षणिक क्षेत्राचे पावित्र्य आणि परीक्षा पद्धतीची निष्ठा लक्षात घेऊन विद्यापीठांनी पर्यायी व सुलभ परीक्षा पद्धतीचा विचार करावा जेणे करून ही प्रक्रिया अल्प कालावधीत व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सी.बी.सी.एस. बाबतच्या गरजेशी सुसंगत व यशस्वी होईल. त्यामध्ये एम.सी.क्यु (बहुपर्यायी प्रश्न) / ओ.एम.आर आधारीत परीक्षा, खुले पुस्तक परीक्षा, खुले पर्याय परीक्षा, असाइन्मेंट/ सादरीकरणाधारित मूल्यमापन इत्यादींचा अंतर्भाव होतो.

ब) विद्यापीठांनी प्रभावी व नवकल्पक पद्धतीने परीक्षांचे आयोजन करावे, ज्यात तीन तासांच्या परीक्षांऐवजी दोन तासांच्या परीक्षांचे आयोजन करावे. गरजेप्रमाणे मात्र परीक्षा पद्धतीचे पावित्र्य कायम राखत विविध पाळ्यांमध्ये परीक्षांचे आयोजन करता येईल व विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनचे गांभीर्य व पावित्र्यही राखता येईल.

क) विद्यापीठांनी त्यांच्या प्रचलित परीक्षांचे नियम, अध्यादेश, अधिनियमांच्या आधारे ऑनलाईन/ ऑफलाईन पद्धतीने परीक्षा आयोजित कराव्यात. विद्यापीठांकडे असलेल्या पायाभूत सुविधांचा पूर्ण विचार करुन व सुरक्षित सामाजिक अंतर पाळून तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांना उचित संधी मिळेल याची खातरजमा करण्यात यावी.

ड) विद्यापीठांनी परीक्षा १ जुलै ते ३१ जुलै, 2020 दरम्यान आयोजित कराव्यात मात्र सामाजिक अंतर पाळले जाईल याची काळजी घ्यावी.

इ) पदविका, पदवीपूर्व आणि पदव्युत्तर परीक्षांच्या अंतिम वर्षाचे प्रात्यक्षिके घेताना छोट्या तुकड्यांत तसेच कमीत-कमी वेळेत पूर्ण दिवसांत अनेक तुकड्या असे करुन घ्यावात. अंतस्थ व बहि:स्थ परीक्षक एकाच महाविद्यालयाचे चालतील. मौखिक परीक्षा किंवा प्रकल्प-मौखिक परीक्षा स्काईप, किंवा इतर उपकरणांच्या माध्यमातून घ्याव्यात. जर विद्यार्थ्यांचे त्यांना

Scanned by CamScanner

प्रत्यक्ष बोलावून मूल्यमापन करणे शक्य नसेल तर त्याचे जर्नल्स, अंतर्गत परीक्षा (असल्यास) व मौखिक परीक्षा याआधारे त्याचे मूल्यमापन करावे.

सर्व अंतिम वर्गातील पदविका, पदवीपूर्व आणि पदव्यूत्तर विद्यार्थ्यांचे परीक्षांचे काही अनुशेष शिल्लक असल्यास अशा परीक्षांचे नियोजन ०१ जुलै ते ३१ जुलै २०२० च्या दरम्यान पूर्ण करण्यात यावेत. या अनुशेष परीक्षांसाठी लागणाऱ्या प्रश्नपत्रिका त्या त्या महाविद्यालयांने विद्यापीठांच्या मार्गदर्शनाखाली तयार कराव्यात. अशा अनुशेष परीक्षांचा कालावधी विद्यमान विद्यार्थांसाठी असलेल्या कालावधीसारखा समान असावा, अनुशेष स्तरावरावरील परीक्षा या शक्यतो मुख्य परीक्षेच्या आधी घ्याव्यात. जर विद्यार्थी हा अनुशेष भरून काढू शकला नाही किंवा अनुत्तीर्ण झाला, तरी त्याला पुढच्या सत्रात परीक्षेला बसण्याची मुभा द्यावी.

४. १३ मार्च २०२० पर्यंत नियमित वर्ग अध्ययनातून पूर्ण झालेला अभ्यासक्रम हा अंतिम वर्षाच्या पदविका, पदवीपूर्व आणि पदव्युत्तर परीक्षेसाठी ग्राह्य धरण्यात यावा.

५. इंटर्नशिप तसेच अनुषंगिक कार्यांच्या अनुषंगाने सर्व भागधारकांची सुरक्षितता याअनुषंगाने विद्यापीठे/ महाविद्यालयांनी काही खालील काही बाबींचा अवलंब करावा.

i) विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने इंटर्नशिप किंवा अनुषंगिक कार्ये करण्यास तसेच घरी राहून डिजीटल पद्धतीने कार्ये करण्यास परवानगी द्यावी.
ii) सध्या सुरू असलेल्या प्रकल्पात किंवा कार्यात त्यांना गुंतवूण ठेवावे.
iii) इंटर्नशिपचा मानीव कालावधी लांबविण्यात यावा.
iv) इंटर्नशिपचा कालावधी कमी करण्यात यावा तसेच असायमेंट सोबत त्याची जोड द्यावी.

६) पी.एचडी आणि एम.फिलचे व्हायवा-व्होसे घेण्यासाठी विद्यापीठे व्हिडिओ कॉन्फरंसिंगकरीता गुगल, स्काईप, मायक्रोसॉफ्ट तंत्रज्ञानाच्या माध्यमांचा वापर करु शकतात. किंवा जे अधिक सोयीचे होईल अशा माध्यमातून याचे नियोजन करता येईल मात्र त्यासाठी प्रचलित विद्यापीठांचे नियम व विद्यापीठ अनुदान आयोगाने २०१६ ला निर्गमित केलेल्या ९.६ आणि ९.९ यात अधोरेखित केलेल्या बाबींची पूर्तता केली जाईल याची काळजी घेणे गरजेचे असेल. व्हायवा-व्हॉस परीक्षांचे नियोजन करताना ते संशोधन मार्गदर्शक आणि परीक्षक यांच्यासोबतच संशोधन सल्लागार समितीचे सदस्य, विभागातील सर्व शिक्षक आणि संशोधकांसह इच्छूक तज्ज्ञ/ संशोधकांसाठी खूले असेल. त्याचबरोबर तज्ञांनी स्वाक्षरी केलेल्या अहवालाची रितसर नोंद विद्यापीठाने करावी.

७ ) ज्या एम.फिल आणि पी.एचडी. विद्यार्थ्यांना त्यांचे प्रबंध, प्रबंधिका सादर करण्याची अंतिम तारीख किंवा कमाल मर्यादा विद्यापीठांच्या प्रचलित नियम/ अधिनियमांनुसार संपूष्टात आली असेल किंवा कोव्हिड-१९ या काळावधीत संपूष्टात येत असेल अशा विद्यार्थ्यांना त्यांचे प्रबंध/ प्रबंधिका व त्या बरोबरच्या इतर बाबी सादर करण्यास मुदतवाढ देण्यात यावी किंवा प्रबंधांचा स्विकार करण्यात यावा व पुढील सहा महिन्यात प्रलंबित राहिलेली कार्यवाही करण्यात यावी. तसेच जे विद्यार्थी प्रबंध सादर करु शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांसाठी सहा महिन्याचा कालावधी वाढवून देण्यात यावा.

Scanned by CamScanner

८) कोव्हिड-१९ च्या उद्रेकामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना परीक्षा आणि त्यांच्या शैक्षणिक हितासाठी मार्गदर्शन मिळावे यासाठी विद्यापीठांमध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष आणि हेल्पलाईल सुरु करण्यात यावी. परीक्षांसाठी तसेच शैक्षणिक वेळापत्रकाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि सहाय्य मिळणेसाठी जिल्हानिहाय समुपदेशनाची सोय उपलब्ध करुन देण्यात यावी.

९) सर्व स्वायत्त महाविद्यालयांनी जेथे आवश्यक आहे तेथे उपर्निदिष्ट मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे, सर्व विद्यार्थ्यांना समान संधीची उपलब्धतता आणि परीक्षांचे पावित्र्य आणि गुणवत्ता राखली जाईल याची त्यांनी काळजी घ्यावी.

१०) ज्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन तथा-विद्यापीठ परीक्षांचे अर्ज सादर केले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरले जावेत तसेच त्यांची माहिती व अर्जात भरलेल्या सर्व माहितींची खातरजमा ही त्या-त्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी विहित कालावधीत करुन घ्यावी.

११) ३१ जुलै २०२० पर्यंत पदविका, पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा घेणे शक्य होणार नाही असे वाटल्यास राज्य सरकारकने जूनच्या अंतिम आठवड्यात परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील सूचना द्याव्यात अशी विनंती आहे.

१२) दिनांक ०१ मे, २०२० रोजी एआयसीटीई कडून प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने उपर्निदिष्ट शिफारशी या पॉलिटेक्निक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना सुद्धा लागू राहतील ( परिशिष्ठ-२)

१३) पदवीपूर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी परीक्षा शक्यतो ०१ जुलै ते १९ जुलै, २०२० आणि पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी शक्यतो २० जुलै ते ३० जुलै २०२० दरम्यान आयोजित करण्यात यावी. तसेच अतिवृष्टी किंवा वाहतूकीच्या अपुऱ्या साधनांमुळे किंवा इतर अनुषंगिक बाबींच्या कारणामुळे विद्यार्थी विहीत तारखांमध्ये परीक्षेस प्रविष्ट होऊ शकला नाही अशावेळी सीईटी परीक्षेस बसण्यासाठी आणखी एक संधी देण्यात यावी. त्याचबरोबर विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी अधिकाधिक परीक्षा केंद्रांची व्यवस्था करण्यात यावी.

१४) एसएनडीटी महिला विद्यापीठाचे कार्यक्षेत्र देशभर असून सात राज्यांमध्ये त्यांचे सलंग्नित महाविद्यालये आहेत. अशावेळी कोव्हीड-१९ च्या परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेऊन उपलब्ध सोयी आणि परिस्थितीनूसार त्यांनी परीक्षांचे नियोजन करावे.

१५) विविध अभ्यासक्रमांसाठी प्रविष्ठ असलेल्या परदेशी विद्यार्थ्यांच्या बाबतीत प्रत्येक विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमित केलेल्या सुचनांचे पालन करावे.

Scanned by CamScanner

(ब) शैक्षणिक वेळापत्रकामध्ये (Academic Calendar) अल्प बदल सुचवून, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन राज्यातील विद्यापीठांनी करावे.

| | |
|---|---|
| ग्रीष्मकालीन सुट्टी / उन्हाळी सुट्टी | प्रत्येक विद्यापीठाने ग्रीष्मकालीन/ उन्हाळी सुट्टीच्या कालावधीचे नियोजन त्यांच्यास्तरावर करावे. |
| महाविद्यालये व विद्यापीठे सुरू होण्याची तारीख | जून १५, २०२० ( तात्पुरत्या स्वरुपात) |
| शैक्षणिक उपक्रमांच्या पूर्वतयारीचा कालावधी | ३० जूनपर्यंत , २०२० |
| पदवीपूर्व व पदव्युत्तर अंतिम परीक्षा वगळून इतर परीक्षांच्या गुणपत्रिका विद्यापीठाला सादर करण्याची तारीख | ३० जून, २०२०पर्यंत |
| पदविका अभ्यासक्रम, पदवीपूर्व व पदव्युत्तर अंतिम परीक्षा वगळून इतर सर्व परीक्षांचे निकाल जाहीर करण्याची तारीख | १५ जुलै, २०२०पर्यंत |
| पदविका अभ्यासक्रम, पदवीपूर्व व पदव्युत्तर अंतिम परीक्षा व त्यांच्या इतर अनुशेष परीक्षांच्या तारखा | ०१ जुलै ते ३१ जुलै, २०२० |
| पदविका अभ्यासक्रम, पदवीपूर्व व पदव्युत्तर अंतिम परीक्षांचे तसेच त्यांच्या अनुशेष परीक्षांचे निकाल | १५ ऑगस्ट, २०२० पर्यंत |
| शैक्षणिक वर्ष २०२० - २०२१:<br>अ) पदविका, पदवीपूर्व आणि पदव्युत्तरच्या अभ्यासक्रमांचे प्रथम वर्ष वगळून सर्व अभ्यासक्रमांचे वर्ग<br>ब) प्रथम वर्ष- पदविका,पदवीपूर्व आणि पदव्यूत्तर | अ) ०१ ऑगस्ट, २०२० पासून<br>ब) ०१ सप्टेंबर २०२० पासून |

(क) विद्यमान परिस्थिती आणि भविष्यकालिन अनिश्चितता

१) विद्यापीठांनी विद्यार्थ्यांच्या, शैक्षणिक संस्थांच्या आणि संपूर्ण शिक्षण क्षेत्राच्या हितासाठी पारदर्शक पद्धतीने या मार्गदर्शक तत्वांमध्ये परिस्थितीच्या अनुषंगाने बदल, भर, सुधारणा करुन अवलंब करावा.
२) जर एखादी शिक्षण संस्था केंद्र किंवा राज्य सरकारने प्रतिबंधित व जमावबंदी केलेल्या क्षेत्रात येत असेल अशावेळी त्या संस्थेनी परिस्थिती अनुकूल निर्णय घ्यावेत. वरिल शिफारशी शासकीय किंवा सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी पारीत केलेल्या मार्गदर्शक तत्वे किंवा सूचना यांच्या आड येणार नाहीत.

तथापी, वरील शिफारशींच्या अनुषंगाने शैक्षणिक सत्र, परीक्षांचे नियोजन, शैक्षणिक वेळापत्रक तसेच पुढील सत्रांचे नियोजन करताना प्रत्येक महाविद्यालये, विद्यापीठांनी कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीवर राज्य / केंद्र सरकार, मनुष्य बळ विकास मंत्रालय, विद्यापीठ अनुदान आयोग यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना, मार्गदर्शक तत्वे यांचे काटेकोरपणे पालन करावे.

Scanned by CamScanner

(ड) कोव्हीड-१९ या साथीच्या रोगाचा प्रसार आणि त्याचा दैनंदिन जीवनावर होणारा प्रभाव व याची व्याप्ती राज्याच्या वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये भिन्न स्वरूपात दिसून येत आहे. म्हणूनच, विद्यापीठे / महाविद्यालयांमध्ये परीक्षांचे नियोजन आणि शैक्षणिक वेळापत्रकांच्या अंमलबजावणीत अडचणी उद्भवत असल्यामुळे या अहवालाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी उपाययोजना सुचविण्याकरिता महाराष्ट्र राज्य सरकारने एक सल्लागार समिती गठीत करण्याची शिफारस केली जात आहे.

कोव्हीड-१९ या साथीच्या रोगाचा प्रभाव दीर्घकालिन असू शकतो, या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात ऑनलाइन शिक्षण प्रणाली एक आवश्यक भाग बनू शकते. ऑनलाईन शिक्षणाच्या पद्धती आणि विद्यापीठे व महाविद्यालये यांच्या नियमित कामकाजांमध्ये ते किती प्रमाणात वापरले जावेत यासाठी सूचना करण्यासाठी ही समिती राज्य सरकारला एका समितीचे गठण करण्याची शिफारस करीत आहे.

(इ) उपरोक्त शिफारशी (एकतर पूर्ण/अंशतः किंवा काही सुधारणांसह) माननीय कुलपती महोदयांनी स्वीकारल्यास, माननीय कुलपती कार्यालयास विशेष बाब म्हणून सर्व विद्यापीठांना या शैक्षणिक वर्षाच्या परीक्षांचे नियोजन आणि पुढील शैक्षणिक वर्षाच्या आयोजनासाठी विशेष निर्देश देण्याची विनंती केली जाऊ शकते. जेणेकरून विद्यापीठांच्या संबंधित प्राधिकरणांमार्फत या शिफारशी मंजूर करण्यासाठी अन्यथा लागणारा वेळ वाचू शकेल व आवश्यक अंमलबजावणी जलदगतीने होईल.

**ऋणनिर्देश:**

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे व तद्अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठाच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरीता मा. उदय सामंत, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी राज्यस्तरीय समिती गठीत करून शिफारशी करण्याची संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल सर्वप्रथम समितीमार्फत त्यांचे आभार व्यक्त केले जात आहेत. तसेच मा. प्राजक्त तनपूरे, राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचेही विशेष आभार समितीमार्फत नोंदविले जात आहेत. या समितीला वेळोवेळी अमूल्य मार्गर्शन आणि सूचना केल्याबद्दल मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण श्री. सौरभ विजय यांचेही विशेष आभार समितीमार्फत मानले जात आहेत. विद्यापीठ अनुदान आयोग आणि इतर शिखर संस्थांच्या सूचना आणि मार्गदर्शक तत्वांच्या आधारे या समितीने शिफारशी केल्या आहेत. समितीच्या वतीने विद्यापीठ अनुदान आयोग आणि त्यांच्या समितीने केलेल्या तपशीलवार मार्गदर्शक तत्वाबद्दल त्यांचे विशेष आभार व्यक्त केले जात आहेत. समितीचा अहवाल तयार करण्यासाठी मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष श्री. संदीप कदम, प्राचार्य डॉ. राजीव मिश्रा, संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी डॉ. अतूल साळुंके या सर्वांचे विशेष सहकार्य लाभल्याबद्दल समितीच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त केले जात आहेत.
राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरू, तंत्रज्ञान विद्यापीठ, मुक्त विद्यापीठांचे कुलगुरू, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक संघटना, विद्यार्थी संघटना आणि अनेक भागधारकांकडून प्राप्त झालेल्या विविध सूचनांसाठी समितीच्या वतीने सर्वांचे आभार व्यक्त केले जात आहेत.

Scanned by CamScanner

स्वाक्षरीत/-

१. प्रा. सुहास पेडणेकर, कुलगुरू, मुंबई विद्यापीठ (निमंत्रक ) ______________

२. प्रा. नितीन करमळकर, कुलगुरू, सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ______________

३. प्रा. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ ______________

४. प्रा. शशिकला वंजारी, कुलगुरू, एस.एन.डी. टी, विद्यापीठ ______________

५) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण , महाराष्ट्र शासन ______________

६. डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन ______________

Scanned by CamScanner

# परीशिष्ट -१

## कालावधीसह अभ्यासक्रमांची माहिती

| (अ) | पदवीपूर्व अभ्याक्रम | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अभ्यासक्रम | कालावधी (वर्षात) | एकूण सत्र | श्रेणीकरीता विचाराधीन सत्र | अंतिम वर्षाचे सत्र | परीक्षा घ्यावयाचे सत् |
| | बी.ए. (B.A) | ०३ | ०६ | १ ते ३ | ५ आणि ६ | ०६ |
| | बी.एड. (B.Ed) | ०२ | ०४ | १ | ३ आणि ४ | ०४ |
| | बी.कॉम (B.Com) | ०३ | ०६ | १ ते ३ | ५ आणि ६ | ०६ |
| | बी.एस्सी (B.Sc) | ०३ | ०६ | १ ते ३ | ५ आणि ६ | ०६ |
| | बी.व्होक (B.Voc) | ०३ | ०६ | १ ते ३ | ५ आणि ६ | ०६ |
| | बीबीए/बीबीए(आयबी)/बीबीए (सीए)BBA/BBA (IB)/BBA(CA) | ०३ | ०६ | १ ते ३ | ५ आणि ६ | ०६ |
| | बीएचएमसीटी (BHMCT) | ०४ | ०८ | १ ते ५ | ७ आणि ८ | ०८ |
| | बीई (BE) | ०४ | ०८ | १ ते ५ | ७ आणि ८ | ०८ |
| | बी.फार्म (B. Pharm) | ०४ | ०८ | १ ते ५ | ७ आणि ८ | ०८ |
| | बी.आर्च (B. Arch) | ०५ | १० | १ ते ७ | ९ आणि १० | १० |
| | बीएस्सी (एचएस) BSc (HS) | ०३ | ०६ | १ ते ३ | ५ आणि ६ | ०६ |
| | बी.प्लानिंग (B. Planning) | ०४ | ०८ | १ ते ५ | ७ आणि ८ | ०८ |
| | अभियांत्रिकी डिप्लोमा (पदविका) (Diploma in Engineering) | ०३ | ०६ | १ ते ३ | ५ आणि ६ | ०६ |
| ** | बीएमएस (BMS) | ०३ | ०६ | १ ते ३ | ५ आणि ६ | ०६ |
| | बीएमएस/ एमबीए (५ वर्षे (BMS/ MBA (5Yrs) ) | ०५ | १० | १ ते ७ | ९ आणि १० | १० |
| | एलएलबी (LLB) | ०३ | ०६ | १ ते ३ | ५ आणि ६ | ०६ |
| | बीएलएस (५ वर्षीय) (BLS (5 Yrs) | ०५ | १० | १ ते ७ | ९आणि १० | १० |
| | बीबीए/एलएलबी एकात्मिक (BBA/LLB Integrated ) | ०५ | १० | १ ते ७ | ९ आणि १० | १० |

Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | बी.पीएड (BPED) | ०२ | ०४ | १ | ३ आणि ४ | ०४ |
| | बीएमएम (BMM) | ०३ | ०६ | १ ते ३ | ५ आणि ६ | ०६ |
| | BSW | ०३ | ०६ | १ ते ३ | ५ आणि ६ | ०६ |
| | B LIB | ०३ | ०६ | १ ते ३ | ५ आणि ६ | ०६ |
| | BFA | ०४ | - | १ ते २ वर्षे yrs | ०४ वर्षे | ०४ yrs |
| (ब) | पदव्यूत्तर अभ्यासक्रम | | | | | |
| | अभ्यासक्रम | कालावधी (वर्षात) | एकूण सत्र | श्रेणीकरीता विचाराधीन सत्र | अंतिम वर्षाचे सत्र | परीक्षा घ्यावयाचे सत्र |
| | एम.ए./एम.कॉम/एम.एस्सी/एमई/एम.फार्म/एम.आर्च/एम.व्होक/ एम.प्लानिंग (MA / M.Com/ MSc/ ME/ M. Pharm/M. Arch / M.Voc./ M. Planning) | ०२ | ०४ | १ | ३ आणि ४ | ०४ |
| | एमबीए (MBA) | ०२ | ०४ | १ | ०३ आणि ०४ | ०४ |
| | एमसीए (MCA) | ०३ | ०६ | १ आणि ३ | ०५ आणि ०६ | ०६ |
| | सरळ द्वितीय एमसीए (Direct Second Year MCA) | ०२ | ०४ | १ | ०३ आणि ०४ | ०४ |
| ** | एमएमएस (MMS) | ०२ | ०४ | ०१ | ०३ आणि ०४ | ०४ |
| | अर्धवेळ तीन वर्षीय पदव्युत्तर मास्टर इन मॅनेजमेंट (PART TIME THREE YEAR MASTER PROGRAMS IN MANAGEMENT) | ०३ | - | १ वर्षे | - | ०३ वर्षे |
| | एम.एड (M.ED) | ०२ | ०४ | ०१ | ०३ आणि ०४ | ०४ |
| | एम.पी.एड(M.P.ED) | ०२ | ०४ | ०१ | ०३ आणि ०४ | ०४ |
| | एमएसडब्ल्यू (MSW) | ०२ | ०४ | ०१ | ०३ आणि ०४ | ०४ |

टिप- १) अंतिम वर्ष पदवीपूर्व आणि पदव्युत्तर विषम सत्राच्या परीक्षा घेण्यात आल्या आहेत

२) वर नमूद केलेल्या अभ्यासक्रमांव्यतिरीक्त विद्यापीठांचे इतर काही अभ्यासक्रम असतील अशा अभ्यासक्रमांचे नियोजन वरील सुत्रानुसार करण्यात यावे.

Scanned by CamScanner

## परिशिष्ट- २

## पदविका अभ्यासक्रम आणि कालावधी (पॉलिटेक्नीक)

| अभ्यासक्रमांचे नाव आणि स्वरुप | कालावधी | एकूण सत्र | श्रेणीकरीता विचाराधीन सत्र | अंतिम वर्षांचे सत्र | परीक्षा घ्यावयाचे सत्र |
|---|---|---|---|---|---|
| दहावीनंतरचे अभियांत्रिकी पदविका (Post SSC Engineering Diploma) | ३ वर्ष | ०६ | १ ते ३ | ५ आणि ६ | ६ |
| बारावीनंतरचे पदविका (डी.फार्म) (Post HSC Diploma in Pharmacy (D.Pharm) | २ वर्ष | -- | प्रथम वर्ष | — | द्वितीय वर्ष |
| बारावीनंतरचे पदविका (एच.एम.सी.टी) (Post HSC Diploma in H.M.C.T) | ३ वर्ष | ०६ | १ ते ३ | ५ आणि ६ | ६ |
| बारावीनंतरचे पदविका (सरफेस कोटींग टेक्नोलॉजी) (Post HSC Diploma in Surface Coating Technology) | ३ वर्ष | ०६ | १ ते ३ | ५ आणि ६ | ६ |

टिप- अंतिम वर्षांच्या पदविकांसाठी विषम सत्राच्या परीक्षा घेण्यात आल्या आहेत

Scanned by CamScanner